Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# मुस्लिम मराठी स्त्री आत्मकथनकार : एक दृष्टिक्षेप

**प्रा. डॉ. नामदेव भिला माळी**, सहायक प्राध्यापक, मराठी विभाग, वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ धुळे संचलित, कला, वाणिज्य व बीसीए महिला महाविद्यालय, देवपूर, धुळे

**सारांश**

मराठी साहित्यामध्ये विविध साहित्य प्रकार आहेत. प्रत्येक साहित्य प्रकाराची काही खास वैशिष्ट्ये आहेत. कथा, कादंबरी, काव्य, निबंध, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मय प्रकाराबरोबर 'आत्मकथन' हा वाङ्मय प्रकार मराठी वाङ्मयामध्ये आपले मूळ रोवताना दिसतो. मराठी साहित्यात हा साहित्य प्रकार उशिराने उदयास आला. दलित साहित्याच्या उदयामुळे या साहित्य प्रकाराला अनन्यसाधारण महत्त्व आले. दलित साहित्यात आत्मचरित्राच्या लेखन ऊर्मीतून 'आत्मकथन' उदयास आले. मराठी साहित्यामध्ये वाङ्मय प्रकारांनी आपले अस्तित्व राखण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मराठी साहित्यात आत्मकथन हा लेखन प्रकार आहे. यात मुस्लिम स्त्री लेखिका देखील आपल्या जीवन प्रवासावर त्यांनी आत्मलेखन केलेले आहे. यामध्ये मेहरुनिस्सा दलवाई यांनी 'मी भरून पावले आहे' हे आत्मकथन लिहून आपल्या आयुष्यातील पतीच्या कार्यावर महती सांगितलेली आहे. श्रीमती खातुन बशीरद्धीन मत्तिकोप यांनी 'खातून' हे आत्मकथन लिहून भारतीय मुस्लिम स्त्रीच्या प्रपंचातील कर्तृत्वाची शक्ती किती अफाट असते हे या आत्मकथनातून दाखवून दिलेले आहे. 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे आत्मकथन मल्लिका अमीर शेख यांनी लिहून आपल्या स्पष्ट व बेधडक निवेदन शैलीमुळे मराठी साहित्यात प्रकाश झोतात आहे.आपल्या जीवनामध्ये कोणाचेही, कसलीही भीती न बाळगता आपल्या जीवनातील प्रसंगांचे वास्तववादी चित्रण या आत्मकथनात केलेले आहे. जातीबाहेर विवाह करून एक वेगळाच पांडा निर्माण केला असला तरी त्यांनी आपले स्थान मराठी साहित्यात एक वेगळ्या उंचीवर निर्माण केलेले आहे. आशा अपराध यांचे भोगले जे दुःख त्याला हे आत्मकथन लिहून परिस्थितीशी काळाशी घडणाऱ्या लेखिकेने जीवनात सोसलं, भोगलं ते त्यांनी आत्मकथनात वास्तववादीपणे मांडलेली आहे. नसीमा हुरजूक यांचे देखील 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन आपलं वेगळं स्थान निर्माण करते.

**प्रस्तावना**

मराठी साहित्यामध्ये लेखकांनी ज्या उंचीपर्यंत आत्मकथने नेलेली दिसतात. तीच उंची मराठीतील लेखिकांच्या आत्मकथनाने गाठलेली दिसते. लेखकांनी लिहिलेली आत्मकथनेही लेखिकांनी लिहिलेल्या आत्मकथनापेक्षा वेगळी असलेली दिसतात. मराठी लेखकांच्या आत्मकथनांच्या गुणवत्तेपेक्षा स्त्रियांची आत्मकथने सरस ठरतात. मराठी साहित्यामध्ये स्त्रियांनी लिहिलेली आत्मकथने ही १९७० नंतरच बहरास आली. या अगोदरची आत्मकथने ही पतीचरित्रेच असलेली दिसतात. "स्त्री आत्मकथने ही निव्वळ पतिचरित्रे नसतात तर तो एक समाज, संस्कृती आणि धर्म यांच्या संस्काराचा मानसिक प्रवास असतो."[१] पण १९७० नंतरच्या आत्मकथनांचे स्वरूप बदललेले दिसते. या काळातील स्त्रियांनी 'स्व' चा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. ज्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणावर स्त्रियांचे आत्मकथन हे दाल भरलेले दिसते. या आत्मकथनांमध्ये अतिशय धाडसाने आपले जीवन जगणारी अशी हंसा वाडकर आपले चांगले-वाईट अनुभव या आत्मकथनाच्या साह्याने सांगता येतात एका स्त्रीची होणारी ससेहोलपट येथे चित्रीत झालेली दिसून


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(*https://jetjournal.us/*)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

येते. यात मुस्लिम आत्मकथनकार स्त्री लेखिका देखील मागे पडलेला दिसून येत नाहीत. त्यांनीही आपला जीवन प्रवास आत्मकथनातून अत्यंत बेधडकपणे मांडलेले आहे. यामध्ये मेहरुनिस्सा दलवाई, श्रीमती खातुनबी बशीरुद्दीन मत्तीकोप, मल्लिका अमरशेख, नसीमा हुरजूक आशा आपराद इत्यादी नवे प्रकर्षाने घेता येतात.

**मुस्लिम मराठी लेखिकांची आत्मकथने**

**मेहरुनिस्सा दलवाई**

मराठी साहित्य विश्वात मुस्लिम मराठी लेखकांनी आत्मकथने लिहून मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले त्याचप्रमाणे मुस्लिम मराठी लेखिकांनीही थोडीफार आत्मकथने लिहून आपले स्वतःचे वेगळे असे अस्तित्व निर्माण केलेले आहे. यामध्ये 'मी भरून पावले आहे' हे मेहरून्निसा दलवाई यांचे आत्मकथन आहे. हे आत्मकथन ९ ऑगस्ट १९९५ रोजी साधना प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले आहे. हमीद दलवाईंविषयी असणाऱ्या आठवणी सरिता पदकींना सांगून त्या 'मी भरून पावले आहे' या आत्मकथनात्मक ग्रंथ लिहून सर्वांसमोर मांडलेल्या आहेत. या आत्मकथनाचा आत्मा हमीद दलवाईंचे व्यक्तिमत्त्व आहे. आत्मकथनाचे जीवित मेहरून्निसा दलवाई आहेत. आत्मकथनामध्ये हमीद दलवाई व मेहरून्निसा दलवाई यांच्या सहवासातील एकोणीस वर्षे सुख दुःख, ताण-तणाव, हमीद दलवाईंचे जीवघेणे आजारपण आलेले आहे. या आत्मकथनात लेखिकेने आपल्या जीवनातील प्रसंग स्वानुभव कथन केलेले आहेत. त्यातून त्यांच्या जीवनातील संघर्ष लक्षात येतो.

या आत्मकथनात हमीद दलवाई समाजसेवक, सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांना लेखिकेने प्रत्येक प्रसंगामध्ये साथ दिली. त्यांची सहचारिणी झाली. त्यांच्या प्रत्येक गोष्टीत आवड निर्माण करून त्यांना मानसिक आधार देणाऱ्या फक्त लेखिकाच होत्या. प्रतिभा जावळीकर याविषयी म्हणतात की, "मेहरून्निसा दलवाई यांनी लिहिलेले 'मी भरून पावले आहे' हे आत्मकथन समाज सेवेत पतीचा प्रयत्न व लेखिकेने त्यांना दिलेली साथ हे अतिशय मनोज्ञ आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्त्व विकासात पतीने दिलेले योगदान अपूर्व आहे."[२] लेखिकेने आत्मकथन आपल्या पतीच्या कार्याची महती सांगितलेल्या सारखेच आहे. हमीद दलवाई हे मोठे सामाजिक कार्यकर्ते झाले ते आपल्या पत्नीमुळे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. कारण, हमीद दलवाईंना त्यांच्या कार्यासाठी मोकळे सोडले ज्यामुळे त्यांना दुसरे कोणतेच ताण-तणाव होऊ नयेत म्हणून लेखिका काळजी घेत. मेहरून्निसा दलवाईनी घरातल्या आर्थिक व कौटुंबिक कटकटीपासून दूर ठेवलं त्यामुळे हमीद दलवाई मोकळेपणाने समाजकार्य करू शकले. लेखिका म्हणते, शेवटी शेवटी ते मला म्हणायचे, "मेहरू आज मी जो आहे तो तुझ्यामुळेच आहे."[३] या विधानातून लेखिका म्हणते याच्यातच मी सगळे भरून पावले आहे. अशाप्रकारे लेखिकेला दलवाईंनी तिच्या बलिदानाची पावती दिलेली आहे. लेखिकेने केलेले लेखन मोकळेपणाने, प्रामाणिकपणाने कोणत्याही प्रकारची लपवाछपवी न करता जे घडले, जे सुखदुःख सोसलं, भोगलं, अनुभवलं, तेच आपल्या आत्मकथनातून निवेदन केलेले आहे. आणि म्हणूनच हे आत्मकथन मराठी साहित्य एक वेगळं स्थान निर्माण करते.

**श्रीमती खातुनबी बशीरुद्दीन मत्तिकोप**

मुस्लिम आत्मकथन साहित्यात अजून एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे श्रीमती खातूनबी बशीरुद्दीन मत्तीकोप. यांचे 'खातुन' हे आत्मकथन. 'खातुन' हे आत्मकथन २००० साली प्रकाशित झालेले आहे. या आत्मकथनाची प्रस्तावना डॉ. सरोजिनी बाबर यांनी केलेली आहे. डॉ. बाबर यांची बहिण सौ. शरदिनी


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मोहिते यांनी प्रस्तावनेच्या आधी थोडं लिहिलेलं आहे. यानंतर स्वतः लेखिकेने मनोगत व्यक्त केलेले आहे. त्यामध्येच 'निमित्त दोन चार...'असे लेखिकेच्या इंजिनिअर मुलाने लिहिलेले आहे, लेखिकेने पंचवीस प्रकरणात विभागून आत्मकथन लिहिलेले आहे. या आत्मकथनात लेखिकेने आपल्या मनातील भावभावनांची मांडणी केलेली आहे.

मुस्लिम स्त्री मराठी या आत्मकथनाच्या माध्यमातून भारतीय मुस्लिम स्त्रीने भारतीय गृहिणीची प्रपंचातील कर्तृत्वाची शक्ती किती अफाट असते हे आत्मकथनातून दाखवून दिलेले आहे. की आत्मकथनात माणुसकी या धर्माचा अवलंब करून त्या माणुसकी धर्मानुसार वागणाऱ्या अशा लेखिका आहेत. अनेक जाती धर्मातील हजारो माणसे जोडणाऱ्या अशा लेखिका आपले वेगळेपण दाखवतात. सहजता, सोज्वळता, प्रासादिकता, आत्मियता, आचरणातील सर्वधर्मसमभाव, शालीनता, माणुसकी, साधेपणा, प्रामाणिकपणा, जिद्द, चिकाटी, घर उभारण्यातील उर्मी, सेवा आणि प्रेम या आणि अशा प्रकारच्या अनेक भावना आत्मकथनामध्ये पावलोपावली जाणवतात. हेच या आत्मकथनाचे वैशिष्ट्य आहे. यामुळेच हे आत्मकथन मराठी साहित्य विश्वात एक वेगळीच उंची निर्माण करते. मराठी कथा विश्वात दर्जेदार साहित्य निर्मिती होणे हे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यात मुस्लिम स्त्री लेखिका देखील मागे राहिलेल्या नाहीत हेच यातून सिद्ध होते.

**मल्लिका अमीरशेख**

मुस्लिम स्त्री लेखिकांच्या मालिकेत अजून एक महत्त्वपूर्ण नाव म्हणजे मल्लिका अमर शेख. यांनी देखील आपल्या जीवनाच्या पटलावर एक महत्त्वपूर्ण आत्मकथन लिहिलेले आहे.'मला उद्ध्वस्त व्हायचंय' हे त्यांचे नावाजलेले आत्मकथन. लेखिकेची स्पष्ट व बेधडक निवेदनशैली असल्यामुळे हे आत्मकथन प्रसिद्धीच्या झोकात आहे. लेखिका कोणताही आडपडदा न ठेवता, कोणाचीही कसलीही भिती न बाळगता वास्तव स्वरूपात आपल्या जीवनातील प्रसंगांचे चित्रण केले. 'स्त्री-पुरूषांच्या आदिम नाट्यातील संबंधाचे नाट्यात्मक असे नागडे चित्रण"[४] या आत्मकथनामध्ये लेखिकेने केलेले आहे, असे प्रसिद्ध साहित्यिक फ. म. शहाजिंदे म्हणतात. वरील विधानात सत्यता वाटते. कारण लेखिकेने या आत्मकथनात आपल्या जीवनातील कोणताही प्रसंग लपवता त्यांनी आपल्या बेधडक निवेदन शैलीतून मांडलेले आहे.

आत्मकथन घर लेखिका मल्लिका अमर शेख यांनी जातीबाहेर विवाह करून एक वेगळाच पायंडा पाडलेला आहे. पण या विवाहामध्ये असणारे ताण-तणाव लेखिकेच्या आत्मकथनामध्ये आलेले आहेत. हे ताण तणाव त्यांनी आपल्या निवेदन शैलीतून वास्तवपणे मांडलेले आहेत. 'मल्लिका अमर शेख या तीव्र संवेदनशील कवयित्री असून त्या जाती धर्म इत्यादी भेदांच्या पलिकडे गेलेल्या असल्यामुळे त्यांना त्यांचा मुस्लिम मराठी आत्मचरित्रकार म्हूणन केलेला हा उल्लेखही आवडणार नाही,' असे फ. म. शहाजिंदेना वाटते. मल्लिका अमीर शेख यांचे नाव मराठी साहित्यातील आत्मकथनात्मक एक वेगळाच ठसा निर्माण करते. आत्मकथनाचे मालिकेत एक वेगळ विश्व निर्माण करणारे म्हणजेच मल्लिका अमीरशेख.

**नसीमा हुरजूक**

या आत्मकथनाच्या यादीतील अजून एक नाव नसीमा हुरजूक. यांनी 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन लिहिलेले आहे. हे आत्मकथन वेगळ्या प्रकारचे आहे. याच लेखिकेने वास्तववादी दर्शन मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.मेहता पब्लिशिंग हाऊसने 'चाकाची खुर्ची' हे आत्मकथन २००१ साली प्रसिद्ध केलेले आहे. लेखवजा असणारे आत्मकथन आपले वेगळेपण जपत आहे. लेखिका पॅराप्लेजियाच्या पेशंट म्हणजे


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*([https://jetjournal.us/](https://jetjournal.us/))*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

कमरेखालील भागाला संवेदनाच नाही अशा अवस्थेमध्ये असणाऱ्या लेखिका आपल्या 'चाकाच्या खुर्ची' च्या साहाय्याने आपली स्वप्ने पूर्ण करतात. आपल्यासारख्या अपंग मुलांचे पुनर्वसन करण्याचे स्वप्न नसीमा हुरजूक प्रत्यक्षात पूर्ण करतात. तसेच अनेक प्रसंग यातून स्पष्टपणे मांडलेले आहेत.

नसीमा हुरजूक यांनी ''चाकाची खुर्ची' या आत्मकथनामध्ये लेखिकेने केलेला अपंगत्वाशी संघर्ष त्याचबरोबर अपंगांसाठी उभी केलेली संस्था स्थापन करण्यासाठी केलेला संघर्ष येथे पहावयास मिळतो. तसेच शून्यातून विश्व निर्मिती करणाऱ्या अशा नसीमा हुरजूक आहेत. स्वतःच्या स्वप्नांना समर्पित केलेले हे आत्मकथन आहे. आत्मकथनामधील व्यक्तिचित्रे ही लक्षणीय व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. साधी सरळ भाषाशैली आहे. एक लोकोत्तर असे नसीमा हुरजूक यांचे व्यक्तिमत्त्व आहे. आपल्या या व्यक्तिमत्त्वाच्या आधारावर त्यांनी देखील एक वेगळेच वैशिष्ट्य आणि स्थान निर्माण केलेले आहे.

**आशा आपराद**

आशा आपराद यांचे ''भोगले जे दुःख त्याला' हे आत्मकथन आहे. हे आत्मकथन देखील मराठी साहित्यातील एक वैशिष्ट्यपूर्ण आत्मलेखन. मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे यांनी प्रकाशित केलेले हे आत्मकथन आहे. महाराष्ट्र राज्य शासनाचा पुरस्कार मिळालेले हे आत्मकथन परिस्थितीशी, काळाशी, वास्तवाशी झगडणाऱ्या आशा आपराद यांचे आहे. या आत्मकथनाबद्दल लेखिका शितल महाजनी म्हणतात की,"आयुष्यात येणाऱ्या संकटांशी सामना करत लढत राहिलं तर जगणं मनासारखं जगता येतं हा संदेश देणाऱ्या या आशा आपराद यांचं हे मनोगत आहे,"[५] वरील विधानावरून शीतल महाजनी या आत्मकथनाबद्दल यथार्थ मांडणी केलेली आहे असे सांगतात. आपल्या आयुष्यातल्या येणाऱ्या संकटांशी सामना कसं करावं हेच या आत्मकथनात यथार्थपणे येते. हे देखील आत्मकथन वाचनानंतर सिद्ध होते.सामान्य मुस्लिम कुटुंबात लहानाच्या मोठ्या झालेल्या, लेखिका वयाच्या एकोणीसाव्या वर्षी चार मुलींची आई म्हणून घेतात. अशा लेखिकेचे आत्मकथन मनाला चटका लावून जाते. जे भोगलं ते लिहिणारी लेखिका आहे. त्यामुळे लेखिकेला पश्चात्ताप करून घेण्याचा प्रश्नच आलेला नाही. हे आत्मकथन अनेकांना जगण्याची प्रेरणा देणारे ठरते, हे सिद्ध होते.

लेखिकेने आपल्या या आत्मकथनात त्यांनी भोगलेल्या, सोसलेल्या हाल अपेष्टा त्यातून शिक्षणाची असणारी आवड, ती आवड जपून जिद्दीने आपले शिक्षण पूर्ण करतात व कोल्हापूर येथे प्राध्यापकाची नोकरी करतात. दारिद्र्य प्रत्यक्ष जन्मदात्री वैरभाव, अल्पवयातील मातृत्व, शिक्षणाची आस अशा संघर्षाच्या अनेक आघाड्यांवर एकाकी झुंज देऊन आपले कर्तृत्व सिद्ध करणाऱ्या निर्भिड व प्रामाणिक लेखिकेचे हे आत्मकथन वाचकांच्या मनाचा ठाव घेतेच पण अस्वस्थ करून जगणे झुंजण्याची ताकद देणारे एका खास उंचीला पोहचलेले हे आत्मकथन आहे. या आत्मचरित्राला आतापर्यंत अत्यंत प्रतिष्ठेचे सात पुरस्कार मिळाले आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, दिल्लीचा काकासाहेब गाडगीळ मातृपित् पुरस्कार, सोलापूरचा भैरव रतन दमाणी पुरस्कार, लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार अशा वर्जेदार संस्थांच्या पुरस्कारांचा समावेश आहे. शासनाच्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले हे आत्मकथन असले तरी सुद्धा मराठी साहित्य विश्व जगतात एक महत्त्वपूर्ण आत्मकथन ठरते. स्त्रीला आपल्या जीवन प्रवासात कसं संघर्ष करावा लागतो या संघर्षामध्ये कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते. या संघर्षातूनच आपलं जीवन कसं उज्वल करावे हे देखील या आत्मकथनातून वाचनांती प्रत्ययास येते.

**समारोप**


Copyright © | JET Network, All Rights Reserved

मराठी साहित्य विश्वामध्ये आत्मकथन हा एक साहित्यप्रकार आहे. या साहित्य प्रकारात अनेक लेखक लेखिका असले तरी देखील मुस्लिम मराठी लेखिकांनी देखील आपल्या लेखन शक्तीच्या ताकदीवर आत्मकथन लिहून एक वेगळेच विश्व निर्माण केलेले आहे. स्त्रीच्या जीवनात सर्वसामान्य येणाऱ्या प्रश्नांना कसे सामोरे जावे लागते त्यात आपल्या जीवनाची यशस्वी वाटचाल कशी करावी हे देखील अत्यंत प्रभावीपणे मांडलेले आहे. या आत्मकथनातील मल्लिका अमर शेख हे मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण नाव त्यांचे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' या आत्मकथनाने तर मराठी साहित्यामध्ये एक नवी उंची गाठलेली आहे. मुस्लिम मराठी लेखिकांनी लिहिलेल्या आत्मकथनात लिहिणारी व्यक्ती मुस्लिमच असल्यामुळे जे सामाजिक जीवन त्यांच्या वाट्याला येते त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर कसा होतो याचे यथार्थ चित्रण मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**निष्कर्ष**

१. मराठी साहित्य विश्वात आत्मकथन हा एक महत्त्वपूर्ण साहित्यप्रकार आहे. या साहित्य प्रकारात मुस्लिम लेखिकांनी देखील आपल्या खडतर जीवन प्रवासावर आत्मकथनांची मांडणी केलेली आहे.
२. या आत्मकथनात वृद्धापकाळाकडे झुकणाच्या आधी तारूण्यातच जीवनात घडलेल्या घटितांमुळे अस्वस्थ होऊन आपला लेखनकाळापर्यंतचा जीवनवृत्तांत आत्मकथनात येतो. त्यात 'स्वतः' आणि समाज या दोन घटकांच्या परस्पर संबंधावर भाष्यही येते.
३. मुस्लिम मराठी लेखिकांनी लिहिलेल्या आत्मकथनात लिहिणारी व्यक्ती मुस्लिम असल्यामुळे जे सामाजिक जीवन त्याच्या वाट्याला येते त्याचा परिणाम त्याच्या जीवनावर कसा होत जातो याचे चित्रण स्पष्ट होताना दिसते.
४. मराठी मुस्लिम स्त्री आत्मकथनांमध्ये अल्पसंख्यांक म्हणून, "मुस्लिम" म्हणून त्यांना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्याचे चित्रण मुस्लिम मराठी आत्मकथनातून येते. मात्र यास काही अपवादही आढळतो. जन्माने व नावाने मुस्लिम असूनही मुस्लिमत्वाचा कोणताही परिणाम ज्यांच्या जीवनचरित्रात आढळत नाही असे 'मला उद्ध्वस्त व्हायचंय' यासारखे आत्मकथन असते. म्हणूनच येथे उल्लेख करता येतो.
५. या आत्मकथनांच्याद्वारे मुस्लिम म्हणून धार्मिक, आर्थिक, सामाजिक आणि मानसिक अशा विविध अंगाचे वास्तवदर्शन येते. त्यात दुःख, दारिद्रय, उपेक्षा, संघर्ष आणि लेखकीय सामाजिक भाष्य कशा स्वरूपात आले आहे. यातूनच आपल्या मनामनातील भावभावनांचे संघर्ष वास्तववादी मांडण्याचे प्रयत्न केलेले दिसून येते.

**संदर्भग्रंथ सूची**

१. संपादक, प्रा. चंद्रकुमार नलगे, डॉ. गंगाधन पानतावणे स्त्री आत्मकथन, प्रकाशक: गुलाबराव मारूतीराव कारले, सुरेश एजन्सी, २०५, शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२, आवृत्ती - प्रथम, जुलै १९९०, प्रस्तावना, पृ. क्र. ७.
२. प्रतिभा जावळीकर", प्रकाशक अशोक कि. कुमठेकर, रजत प्रकाशन, ११८, मैथिली टॉवर्स, वीर सावरकर चौक, टिळकनगर, औरंगाबाद, आवृत्ती - पहिली, २० सप्टेंबर २००९, पृ. क्र.४७.
३. मेहरून्निसा दलवाई, 'मी भरून पावले आहे ', प्रकाशक साधना प्रकाशन, ४३१,शनिवार पेठ, पुणे, ४११०३०, आवृत्ती तिसरी, ८ मार्च २०००. प्रस्तावना - प्र. क्र. दहा


Copyright © | JET Network, All Rights Reserved

४. फ.म. शहाजिंदे, 'मुस्लिम मराठी साहित्य परंपरा, स्वरूप आणि लेखक सूची', प्रकाशक : दयानंद शेटगार, व्यवस्थापक, भूमी प्रकाशन, २१, रिंग रोड, लातूर, पहिली आवृत्ती, २००४, पृ. क्र. २४८.
५. तनिष्का (मासिक) सकाळ पेपर्स लिमिटेडचे प्रकाशन, वर्ष ४, अंक ५, मूळ संपादक - उत्तम मारूती कांबळे, जानेवारी २०१०, पृ. क्र. ८.


Copyright © | JET Network, All Rights Reserved